स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 02–12–2011 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 8. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 9. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 10. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 11. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 12. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 2. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 3. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 4. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 143 :</u>— दिनांक 21.10.2011 ला प्रभाग समितीचे सभेमध्ये ठराव क्र. 115 अन्वये वर्ष 2011—2012 चे झोनल बजे अंतर्गत पद क्र. 719 (विद्युत विभाग म.रा.वि.म. च्या विद्युत खांबावर फेस टाकणे) मध्ये प्राप्त रु. 10,00,000/— ची तरतुद ठेवण्यात आलेली होती तथापि उक्त पदा अंतर्गत खर्च प्रस्तावित करण्यात आलेले नाही. यामुळे संपुर्ण तरतुद शिल्लक आहे. या अनुषंगाने अखर्चीत रक्कम रु. 10,00,000/— पद क्र. 620 (निर्मल शहर योजना मध्ये) वळते करण्याबाबतीच मंजुरी झालेली आहे. करीता पद क्र. 719 (विद्युत विभाग म.रा.वि. म. च्या विद्युत खांबावर फेस टाकणे) मध्ये उपलब्ध असलेली तरतुद रुपये 10,00,000/— हे पद क्र. 620 (निर्मल शहर योजना मध्ये) वळते करण्याकरीता मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 144 :</u>— वॉर्ड क्र. 32, संजय नगर (डेप्टी सिग्नल) शाळेचें बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. फोनिक्स इंजिनिअरींग, यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.99 टक्के कमी दराची रु. 49,24,691/— राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 145 :</u>— नागपूर महानगरपालिकेच्या 35 भंगार वाहने/मशिनरी, भंगार/निकामी टायर, लोखंडी भंगार विक्री करण्याकरिता ई—निविदेअंतर्गत प्राप्त महत्तम ( Offset किमंतीपेक्षा जास्त दर ) दरानुसार विक्री तसेच महत्तम दराचे संबंधित निविदाकार यांनी निविदा अटी—शर्ती नुसार साहित्याची उचल न केल्या द्वितीय/तृतीय महत्तम दराचे निविदाकार ( Offset किमंतीपेक्षा जास्त दर असणारे ) यांना भंगार वाहने/मशिनरी, भंगार/निकामी टायर, लोखंडी भंगार विक्री तसेच क्षतीग्रस्त व जळलेले वाहन क्र. MH31-AG-9916 हे लोखंडी भंगाराअंतर्गत विक्री करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री गायधने : मा. अध्यक्ष महोदय मागील स्थायी समितीच्या बैठकीत उमरेड रोड येथील रोडवर पॅचेस बाबत मी बोललो होतो. अजून काही झालेले नाही.

श्री होतवाणी : विधान भवन परिसरातील काम सुरु असल्यामुळे काम थांबले आहे.

अध्यक्ष : चांगले रस्ते दुरुस्ती करणे सुरु आहे. उमरेड रोड येथील रोडचे परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्याठिकाणी पॅचेस करणे अत्यंत आवश्यक आहे. विधान भवन येथील रस्ते चांगले असतांना पुन्हा दुरुस्ती करण्यात येते आहे. तो रस्ता काही चांगला नाही तातडीने बघून पॅचेसचे कामे करा.

श्री गायधने : उमरेड रोड येथील जलप्रदाय विभागाचे काम अजून पर्यंत सुरु करण्यात आलेले नाही.

श्री माने : जलप्रदाय विभागाचे खाजगीकरण झालेले आहे. आता महानगरपालिकेकडे पाणी वितरणाचे काम करणे, बोरवेल करणे इत्यादी कामे खाजगी कंपनीत समावेश राहील काय ? की जी नस्ती झाली ती राहील.

श्री हस्तक : दि. 28/11/2011 पुर्वी जी कामे पूर्ण झाली आहे. वर्क ऑर्डर झालेली कामे चालू आहे ती सर्व कामे एजन्सी कडे जाणार आहे. त्याचे पेमेंट ते करणार आहे. जी कामे आपण घेतली आहे ती कामे होणार आहे. ज्या कामांच्या फाईल तयार आहे ती सर्व कामे होईल.

श्री गायधने : टेंडर नवीन सी.एस.आर. रेट पेक्षा जास्त येत आहे व काही 30 टक्के कमी येत आहे.

श्री गायकवाड : मा. आयुक्त यांनी असे निर्देश दिलेले आहे की व्यवस्थीत रेट टाकून रिटेंडर करण्यात यावे. तिसऱ्यांदा रिटेंडरला जात आहे. दि. 9/12/2011 ला ओपन होईल. रु. 50 लक्ष वरचे कामे असून रु. 50 लक्षाचे वर कामांना प्रिबेट घेणे आवश्यक आहे. रु. 50 लक्षाचे वर 7 दिवस पर्यंत सेल सुरु राहतो.

श्री बुट्टो :– मा.अध्यक्ष महोदय, हमारे वार्ड मे दूषित पानी आरहा है, जलप्रदाय विभाग को लाईन डालने के लिये बताया था, लेकिन अभी तक काम नही हुआ, अब कंपनी काम करने वाली है फाईल बनाना जरूरी नही है क्या ? दूषित पानी की वजह से कई लोगो को ज्वाईंडीस होगया है, एक आदमी की मृत्यु होगयी है, हंसापूरी, खदान और बापुजी उस्ताद का अखाडा यहां कई दिनो से दूषित पानी आरहा है।

श्री हस्तर : जी कामे तातडीची आहेत ते काम ताबडतोब करावे असे संबंधितांना निर्देश देण्यात आले आहे. सर्व साईड तातडीने हॅान्डडोअर करतो.

श्रीमती डवरे : माझे वार्डात सुध्दा ही दुरुस्ती आहे. ती कामे करुन सुध्दा दुरुस्त झाली नाही. संघ बिल्डींग साईडला वॅालचा प्राबलेम आहे ती दुरुस्त करण्यात यावा.

श्री अन्सारी :– मा.अध्यक्ष महोदय, हमारे वार्ड मे हाजी अब्दुल मजीद लिडर उर्दु प्रायमिरी हायस्कुल है वहां पर 10 हजार विद्यार्थी शिक्षा प्राप्त कर रहे है, वहां पर सेक्युरीटी गार्ड नही होने की वजह से रास्ते पर दुर्घटना होसकती है, उसी तरह से मुस्लिम कब्रस्तान मे गार्ड देने के संदर्भ मे काफी दिनो से चर्चा कर रहा हुॅं, लेकिन अभी तक उस ओर कोई ध्यान नही दिया गया है।

अध्यक्ष : तातडीने सुरक्षा गार्डची व्यवस्था करावी. मोमीनपूरा कब्रस्थान मध्ये सुरक्षा गार्डची व्यवस्था केली असल्यास ती तपासून पाहावी.

श्री तेलंग : श्री राजू लोखंडे यांचे वार्डातील कंत्राटदार यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकावे असे आपण निर्देश दिलेले आहे. तरी ते टेंडर व कोटशन घेत आहे. आपण ब्लॅक लिस्ट करावे असे आदेश दिले आहे. शंभरकर साहेब यांनी कंत्राटदाराच्या कामांची पाहाणी श्री होतवाणी यांनी तपासून केलेली आहे.

श्री होतवाणी : माझेकडे चार नस्ती झालेल्या आहे. चार नस्तीची कामे पूर्ण झालेली आहे.

अध्यक्ष : याचा रिपोर्ट पुढील स्थायी समितीची बैठकीत ठेवावा.

श्री मैंद : 24 X 7 योजनेतील ट्राफीक चिन्ड्रन पार्क येथील नळ कापण्यात आला आहे. कोणत्याही प्रकारची सूचना न देता खाजगी एजन्सीकडून नळ कनेक्शन कापण्यात आले आहे. येथे शाळेतील लहान मुलांच्या सहली येत असतात तेथे पाण्याची व्यवस्था नाही. नळाची पाणी फक्त पिण्यासाठी वापरतात. बाहेरील वापरासाठी विहीरीचे पाणी वापरण्यात येते. तातडीने नळ कनेक्शन सुरु करण्यात यावे. याबाबत पूर्व सूचना देण्यात पाहिजे होत्या.

श्री हस्तक : कनेक्शन बंद करण्यात आली नाही. जुने पाईप लाईन बंद करण्यात आली दोन्ही लाईन जोडून असल्यामुळे दोन्ही लाईन बंद झाल्या.

अध्यक्ष : तातडीने आज कनेक्शन सुरु करण्यात यावे. सिटीझन चार्टर बाबत काय झाले दिल्ली महानगरपालिका येथे सिटीझन चार्टर सुरु झालेले आहे.

श्री निपाणे : सिटीझन चार्टर लागू करण्याबाबत जी.आर., रुल्सची व्यवस्था आहे. माहिती अधिकाराची कामे चालू आहे. आपल्याला वेळ लागेल. जिल्हाधिकारी कार्यालयात लागू करणे सुरु आहे. आपल्या येथे लवकरात लवकर लागू करण्यात येईल.

ठराव क्रमांक 146 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर